# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, २ रा मजला, दक्षिण कक्ष, बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.
दूरध्वनी : (०२२) २७५७१६७३, २७५७०१६६, २७५७१६७७.
मेल : estt6mjp@gmail.com


जा.क्र.मजीप्रा-२०२३/प्र.क्र.२३/आ-५

दिनांक :- १/०८/२०२३.

**म.जी.प्रा.च्या आस्थापनेवरील कनिष्ठ लिपीक/टंकलेखक यांना निम्नश्रेणी लघुलेखक या पदोन्नतीच्या कोटयातील नियमित रिक्त पदांवर तात्पुरती पदोन्नती.**

## कार्यालयीन आदेश

वाचा :- १. सामान्य प्रशासन विभाग, अधिसुचना दिनांक २४ जुन, १९९७.
२. सामान्य प्रशासन विभाग, अधिसुचना दिनांक ३१ जुलै, १९९७.

संदर्भ क्र.१ व २ येथील अधिसुचनेनुसार लघुलेखक या पदावर किमान तीन वर्षाची नियमित सेवा पूर्ण केली असेल आणि या नियमांच्या खंड (ब) च्या उपखंड (३) नुसार विहित लघुटंकलेखनाच्या आणि टंकलेखनाच्या वेगाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केले असेल अशा व्यक्तिची ज्येष्ठता अधीन पात्राता या निकाषावर निम्नश्रेणी लघुलेखक या पदावर पदोन्नतीने नेमणूक करण्यात येईल.

२. संदर्भ क्र.१ व २ येथील अधिसुचनेनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर लघुलेखक हा संवर्ग मंजूर नाही. परंतु, निम्नश्रेणी लघुलेखक हा संवर्ग मध्यवर्ती कार्यालयाचे दिनांक १६/४/२००८ रोजीच्या आदेशात मंजूर आहे. त्यामुळे प्राधिकरणातील कनिष्ठ लिपिक/टंकलेखक व टंकलेखक या पदावरील कार्यरत कर्मचा-यांकडे पात्रता असून देखील हे कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित राहू नये. या कारणास्तव तसेच यापुर्वी प्राधिरकणाच्या आस्थापनेवरील निम्नश्रेणी लघुलेखकाचे रिक्त पदे आवश्यक लघुलेखनाच्या वेग मर्यादेचे प्रमाणपत्र धारण करणा-या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील कनिष्ठ लिपीक/टंकलेखक व टंकलेखक यांना पदोन्नती दिलेल्या आहेत.

३. सबब, वरील परिच्छेद क्र.२ मध्ये नमुद केलेली बाब तसेच संदर्भ क्र.१ व २ येथील शासन अधिसुचनेतील तरतुद विचारात घेऊन खालील कनिष्ठ लिपीक/टंकलेखक यांना रुपये एस १४:३८६००-१२२८०० या वेतनश्रेणीत निम्नश्रेणी लघुलेखक या पदोन्नतीच्या कोटयातील नियमित रिक्त पदावर तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे. सदर पदोन्नत निम्नश्रेणी लघुलेखक यांना नागरी सेवा मंडळाच्या शिफारशी तसेच सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने खालील विवरणपत्रातील रकाना क्र.५ मध्ये दर्शविल्यानुसार पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | कार्यरत कार्यालयाचे नांव | पदोन्नतीनंतर पदस्थापनेच्या कार्यालयाचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री. सतीश सांगळे, कनिष्ठ लिपीक/टंकलेखक | म.जी.प्रा. मंडळ, ठाणे | आस्थापना-५ म.जी.प्रा. मध्यवर्ती कार्यालय, सिडको भवन, नवी मुंबई | रिक्त पदी |

.. २/-

Recd 7/8/23

2023-31-50209
10.8.2023

४. वरील विवरणपत्रातील कनिष्ठ लिपीक/टंकलेखक यांना निम्नश्रेणी लघुलेखक या पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदावर पदोन्नती खालील अटी/शर्तीच्या अधीन राहून सेवाजेष्ठतेनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येत आहे.

अ) वरील कनिष्ठ लिपीक/टंकलेखक यांना निम्नश्रेणी लघुलेखक या पदावर दिलेली तात्पुरती पदोन्नती ही शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ७ मे, २०२१ नुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिकेच्या (विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७) अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात दिनांक २५/५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेनुसार देण्यात येत आहेत.

ब) भविष्यात म.जी.प्रा.ची काही कार्यालये कमी कार्यभारामुळे बंद करावी लागल्यास किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव पदावनत करण्याची आवश्यकता भासल्यास कोणतीही नोटीस किंवा पुर्वसुचना न देता कनिष्ठतम कर्मचाऱ्यास "शेवटच्यास प्रथम" (Last come first go) या तत्वानुसार पदावनत करण्यात येईल व त्यांचा निम्नश्रेणी लघुलेखक पदाच्या ज्येष्ठतेवर हक्क राहणार नाही.

क) उपरोक्त पदोन्नत निम्नश्रेणी लघुलेखक यांच्या कनिष्ठ लिपीक/टंकलेखक संवर्गाच्या सेवाज्येष्ठतेमध्ये काही बदल उद्भवल्यास त्यानुसार, त्यांचे सेवाज्येष्ठतेमध्ये होणारा बदल नोंदवून आवश्यक ती अनुषंगिक पुढील कार्यवाही करण्यात येईल. परिणामी ज्येष्ठतेवर हक्क राहणार नाही.

ड) पदोन्नत निम्नश्रेणी लघुलेखक यांनी त्यांचे वेतननिश्चिती संबंधिताचा विकल्प या आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याचे आत संबंधित कार्यालयास सादर करावेत. विहीत मुदतीत विकल्प प्राप्त न झाल्यास त्यांची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम ११ (१) (अ) नुसार करावी.

इ) पदोन्नत निम्नश्रेणी लघुलेखक त्यांच्या नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे, तसेच सदर पदाचा पदभार स्विकारल्यानंतर त्याचा अनुपालन अहवाल मध्यवर्ती कार्यालय/संबंधित कार्यालयास सादर करावा. पदोन्नत निम्नश्रेणी लघुलेखक यांनी अनधिकृत रजेवर जावू नये. त्यांचे लक्ष्य सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक सीडीआर-१०८२/२५६७/२८/अकरा, दिनांक ३०.८.१९८२ च्या परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे. त्यात दिलेल्या सुचना लक्षात घेऊन नियुक्ती रद्द करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाची आवेदने सादर केल्यास, ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील याची नोंद घ्यावी.

(दिपाली देशपांडे सावेडकर)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

प्रत : माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
- मुख्य अभियंता, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, ठाणे.

.. ३/-

- अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. मंडळ, ठाणे.
- परिमंडळीय अध्यक्ष तथा अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. परिमंडळ, ठाणे.
- उप मुख्य लेखा अधिकारी (१/२), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
- उप अभियंता, आय.टी. सेल, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
- कक्ष अधिकारी, आस्थापना-५, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
- पदोन्नत निम्नश्रेणी लघुलेखक
- कार्यालयीन आदेश धारिका.